नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २४/०२/२०२५ (सोमवार) सकाळ**

---

## जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द कारवाई
## ४१ गोवंश जनावारांना जीवनदान ,स्थानिक गुन्हे शाख नागपुर ग्रामीण यांची कारवाई

दिनांक २३/०२/२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीणचे पथक अैधव धंदयावर कारवाई करणेकामी पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, **एका लाल कंटेनर ट्रक क्र TS12UD6578 या ट्रक मधुन अवैधरित्या,जनावरे कोंबून कत्तलिकरिता नागपुर ते चंद्रपुर मार्गे येणार आहे** . मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी **सातगाव फाटा येथे** नाकाबंदी केली असता संशयीत **लाल कंटेनर ट्रक क्र TS12UD6578 मिळुन आले. वाहन** थांबवुन **वाहनाची** पाहणी केली असता त्यामध्ये **दोरीने क्रूर रित्या बांधून भरलेले पांढऱ्या, काळ्या, रंगाचे ४१ गौवंश असे एकूण ४१ गोवंश, किंमत ४,१०,००० /— रूपयाचे मिळुन आले**.तसेच चालक **१) अफजल अनवर खान वय २८ वर्षे, रा. बैरसिया, भोपाल, मध्यप्रदेश आणि क्लिनर २) इमरान खान रहीम खान वय २८ वर्षे, रा. अलवलिया भोपाल, मध्यप्रदेश हे** मिळुन आले.वाहन मालकाबाबत विचारपुस केली असता **मोहम्मद अमजद कुरेशी, रा. नल्लाकोटा हैदराबाद अशी माहीती प्राप्त झाली.** पोलीसांनी पंचासमक्ष आरोपीतांच्या ताब्यातुन एक **कंटेनर ट्रक क्र TS12UD6578** किंमती २०,००,०००/— **४१ गोवंश, किंमती ४,१०,००० /— रूपये** एकुण किंमती २४,१०,०००/— रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे. मिळुन आलेल्या **पीडित जनावरांना सुरक्षेच्या दृष्टीकोनातून गौशाळा रुइखैरी, बोरी, ता. जि नागपूर येथे दाखल करण्यात आले.**

**आरोपी १) अफजल अनवर खान, वय २८ वर्षे, रा बैरसिया, भोपाल मध्य प्रदेश, २) इमरान खान रहीम खान, वय २८ वर्षे, रा अलवलिया भोपाल मध्य प्रदेश आणि पाहिजे आरोपी ३) ट्रक मालक मोहम्मद अमजद कुरेशी, रा नल्लाकोटा हैदराबाद** यांच्या विरूध्द **पो.स्टे. बोरी येथे कलम ११(१)(अ), (ड) (फ) प्राण्यांना क्रूरतेने वागविण्यास प्रतिबंध अधि.१९६०, सहकलम ५(अ),९ महाराष्ट्र प्राणी सरक्षण अधिनियम सहकलम १८४ मो. वा.का. सहकलम**

**४९, ३(५) बीएनएस अन्वये** गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस स्टेशन बोरी करीत आहे.

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द २ गुन्हे नोंद
## ६१ लाख १० हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त
## उपविभागिय पोलीस अधिकारी ,कार्यालय कन्हान यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कन्हान**:— दिनांक २४/०२/२०२५ रोजी सकाळी ०५:०० वाजेपासुन श्री संतोष गायकवाड, उप विभागीय पोलीस अधीकारी कार्यालय कन्हान हे मौदा परीसरात अवैध धंदयावर कारवाई करणेकामी पेट्रोंलिंग करीत असतांना गुप्त बातमीदार मार्फतीने माहीती प्राप्त झाली की, भंडारा ते नागपुर रोडवर भंडारा कडुन अवैध रित्या रेतीची चोरटी वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी मथनी टोल नाका येथे नाकाबंदी केली करून खालील प्रमाणे कारवाई केली.

**१.** सकाळी ०८:४५ वाजता एक १० चक्का हायवा ट्रक क्र. एम एच ४० सी टी ५६९१ हा भंडारा कडून नागपूर कडे येंताना दिसला त्यास थांबवून वाहनाची पाहणी केली असता सदर वाहनामध्ये मध्ये अंदाजे ६ ब्रास रेती मीळून आली. वाहन चालक **आरोपी क्र १ नामे आशिष रमेश हरडे, वय ३२ वर्षे , रा. कांद्री कन्हान ता. पारशिवनी आणि आरोपी क्र २. क्लिनर मुकेश हेमराज हरडे, रा. कांद्री कन्हान ता पारशिवणी असे मिळुन आले. त्यांना परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याने कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले. मालकाचे नाव विचारले असता आरोप क्र ३. मालक प्रज्वल वानखेडे , रा दिघोरी ,बाहदुरा फाटा, नागपुर अशी** माहीती प्राप्त झाली. पोलीसांनी पंचासमक्ष ट्रक मधुन १) ६ ब्रास रेती किंमती ३०,००० /— रूपये आणि २) हायवा ट्रक क्र. एम एच ४० सी टी ५६९१ किंमती ३०,००,०००/— रूपये आणि ३) २ ॲन्ड्रॉईड मोबाईल फोन किंमती २०,००० /— रूपये असा एकुण **३०,५०,०००/—रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.**

**२.** सकाळी ०९:०० वाजताएक १० चक्का हायवा ट्रक क्र. एम एच ४० सी झेड ४५४५ हा भंडारा कडून नागपूर कडे येंताना दिसला त्यास थांबवून वाहनाची ची पाहणी केली असता सदर

वाहनामध्ये मध्ये अंदाजे १० ब्रास रेती मीळून आली. वाहन चालक **आरोपी नामे प्रदीप ताराचंद उके, वय ३१ वर्षे , रा. पिपरी कन्हान ता. पारशिवनी असे सांगितले. त्याला परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याने कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले. मालकाचे नाव विचारले असता अनमोल पडोळे, रा लक्ष्मी काटा पारडी अशी माहीती प्राप्त झाली.** पोलीसांनी पंचासमक्ष ट्रक मधुन १) १० ब्रास रेती किंमती ५०,००० /— रूपये आणि २) हायवा ट्रक क्र. एम एच ४० सी झेड ४५४५ किंमती ३०,००,०००/— रूपये आणि ३) एक अॅड्रॉईड मोबाईल फोन किंमती १०,००० /— रूपये असा एकुण **३०,६०,०००/—रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे. दोन्ही कारवाईत एकुण एकुण ६१ लाख १० हजाराचा मुददेमाल जप्त करण्यात आला आहे.**

**नमुद ५ आरोपीतांच्या विरूध्द पोस्टे मौदा येथे कलम ३०३(२),३(५), ४९ भा. न्या. संहिता, बि एन एस. सहकलम ४८ (८),४८ (७) महा. जमीन महसुल अधिनीयम व कलम ४,२१ खान व खनीजे अधिनीयम,१९५७. कलम ३ सार्वजनीक संपत्ती नुकसान प्रतिबंधक अधिनियम,१९८४ अन्वये २ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.**




पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर